पनवेल(प्रतिनिधी) खारघर टोलविरोधी आपण प्रथम आवाज उठवून टोलविरोधी जनजागृती केली असून हा टोलबंद झाल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा पुर्नउच्चार आमदार प्रशांत ठाकूर यांनी ओवेपेठ येथे शनिवारी केले. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व ओवे विभागीय कॉंग्रेस कमिटीच्यावतीने ओवेपेठ येथे ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार व छत्री वाटप समारंभ आयोजित करण्यात आला होता. त्याप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते.

सिडकोने कमी दरात येथील शेतकऱ्यांच्या जमिनी घेवून विविध प्रकल्प उभारले. असे असताना या विभागाला सिडकोने विविध सुविधा देण्याचे काम अग्रक्रमाने करणे गरजेचे आहे. याचप्रकारे सायन-पनवेल महामार्गावर स्थानिकांसाठी पर्यायी रस्ता निर्माण करून देणे क्रमप्राप्त होते. असे न करता येथील जनतेवर टोल लादण्याचे काम केले जात आहे, याला आमचा पूर्ण पणे विरोध असून शासनाने टोलबंदचा निर्णय न घेतल्यास ११ जुलैपासून टोल रद्द होईपर्यंत आंदोलन करण्याचा पुर्नइशाराही आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या भाषणातून दिला.

आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, ज्येष्ठ नागरिकांनी आपल्या आयुष्यात अनेक चढ-उतार, सुख-दुःख पाहिले आहेत, त्यांच्या अनुभवांच्या शिदोरीतून नेहमी यशस्वी वाटचाल होत असते, असे सांगून पनवेल विकासाच्या वाटेवर चालत असून यापुढेही अधिक जोमाने काम करण्यासाठी आपल्या आशिर्वादाची नित्यांत गरज असून आशिर्वादाचा आणि मायेचा हात कायम ठेवावा, असेही त्यांनी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधताना म्हंटले. येथील लोकांनी सिडकोच्या विकासासाठी अल्पदरात आपल्या जमीनी सिडकोला दिल्या आहेत, त्यामुळे शहरी भागांप्रमाणे या गावांना पायाभूत सोयीसुविधा मिळाल्या पाहिजेत ही आग्रही मागणी आपण सिडकोकडे केल्याने सिडको हद्दीतील गावांच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी २00 कोटी रूपयांचा निधी सिडकोने मंजूर केला असून त्यामधील कामांना सुरूवात झाली आहेत. आपल्या गावामध्येही कामे सुरू झाली आहेत की नाही याची माहिती घेवून पायाभूत सुविधा मिळवून घेण्यासाठी ग्रामस्थांनी सतर्क रहावे, असे आवाहनही आमदार प्रशांत ठाकूर यांनी यावेळी केले.

यावेळी माजी आमदार मधुकर ठाकूर यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या कामांचा गौरव व कौतुक करून सामाजिक जाणिव आणि सर्वसामान्यांची जाण, कतृत्व, काम करण्याची शैली व चांगली विचारसरणी असलेला लोकप्रतिनिधी म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे पाहिले जात असल्याचे म्हंटले.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, कालच आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेलच्या विकासासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून १६१ कोटी रूपयांचा निधी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्यासोबत झालेल्या बैठकीत मंजूर करून घेतला आहे. यामध्ये पनवेलमधील पाच महत्वपूर्ण रस्त्यांचे कॉंक्रीटकरण, नावडे फाटा व ज्युन्या मुंबई-पुणे महामार्गावरील कळंबोली लोखंड बाजार येथे उडडाणपूल, तक्का गाढी नदी ते पळस्पे फाटा व कळंबोली ते खांदा कॉलनी राष्ट्रीय महामार्गाचे रूंदीकरण व सुधारणा अशी पनवेलच्या दृष्टीने महत्वाची कामे होणार आहेत. खारघर टोलनाका विरोधात पहिला आवाज आमदार प्रशांत ठाकूर यांनी उठवला असे सांगून आज आमदार प्रशांत ठाकूर आमदार म्हणून नाही तर तुमचा लेक म्हणून आशिर्वाद घेण्यासाठी आले

आहेत. या तुमच्या कर्तबगार सुपूत्राने पनवेलमध्ये सातशे कोटी रूपयांची विकासकामे करून पनवेलला विकासाचा चेहरा दिला असून त्यांना तुमचा आशिर्वाद देवून पुन्हा एका प्रचंड मतांनी निवडून द्या, असे आवाहनही ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी ज्येष्ठ नागरिकांना केले.

गेल्या आठ वर्षापासून दरवर्षी ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार नित्यनियमाने करून त्यांचा आशिर्वाद घेतला जात असल्याचे तालुका कॉंग्रेसचे कार्याध्यक्ष अरूणशेठ भगत यांनी सांगून पनवेलमध्ये अनेक विकासकामे करून पनवेलला विकासाचा चेहरा देण्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले असून त्यांच्या रूपाने पनवेलला दुरदृष्टी असलेला नेता मिळाला आहे, असे प्रतिपादन अरूणशेठ भगत यांनी यावेळी केले.

जिल्हा परिषदेतील पक्षप्रतोद राजेंद्र पाटील यांनी आपल्या भाषणातून आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या विकासकामांचा गौरव करून पनवेल मतदार संघात केलेल्या विकासकामांबद्दल त्यांचे आभार व्यक्त केले. तर पनवेल विधानसभा युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांनी आमदार प्रशांत ठाकूर युवकांचा आधारस्तंभ असल्याचे सांगून ज्येष्ठांच्या आशिर्वाद नेहमी त्यांच्या पाठिशी असल्याचे म्हंटले.

यावेळी ग्राहक हित कक्षाच्या तालुकाध्यक्षा दर्शना भोईर तसेच महिला कॉंग्रेसच्या तालुका कार्याध्यक्षा रत्नप्रभा घरत यांनीही आमदार प्रशांत ठाकूर यांच्या कार्यक्षम कार्यप्रणालीचे कौतुक केले त्याचबरोबर ज्येष्ठ नागरिकांनी प्रशांतदादांना आपला आशिर्वाद कायम ठेवून पुन्हा एकदा आमदार म्हणून बहुमतांनी निवडून द्यावे असे आवाहन करीत कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या संजय गांधी निराधार अनुदान योजना, घरकुल, अन्न सुरक्षा, प्राथमिक शिक्षण अशा विविध शासकीय योजनांची माहिती देवून त्यांचा लाभार्थींनी लाभ घेण्याचे आवाहनही उपस्थितांना केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तळोजा जिल्हा परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रभाकर जोशी यांनी केले. या कार्यक्रमास माजी सरपंच मोतीराम जोशी, युवा नेते रईस पटेल, वैभव साबळे, ओवे ग्रामपंचायतीचे उपसरपंच साजिद पटेल, सदस्य सचिन वास्कर, विश्वनाथ चौधरी, जगदिश करावकर, वंदना जोशी, ज्येष्ठ कार्यकर्ते गुरूनाथ ठाकूर, एम.डी.पाटील, विलास तेलवणे, रामभाऊ वास्कर, गणेश जोशी, यशवंत घरत, सलिम पटेल, इरसाद शेख, जयेंद्र म्हात्रे, शशिकांत दवणे, विमल घरत, जयदास तेलवणे, इम्रान पटेल, अमजद शेख, बळीराम जोशी, भागूबाई जाधव, रामनाथ जोशी यांच्यासह कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.